॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २३ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३६५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

✻ सुविचार ✻
जीवनातील त्रास कमी करायचा
असेल तर अपेक्षा ठेवून नका

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### अवमेळ

खरीपाचा हंगाम
आला आहे तोंडी
पण इंधनाने केली
मशागतीची कोंडी
कागदावर सांगता
पुरेसा आहे साठा
जीडीपीचे उद्दिष्ट
मोघमच म्हणे गाठा

## SPOT NEWS

### गोवंश तस्करीवर आता मकोका

● **मुंबई** – राज्यात गोवंशाची अवैध वाहतूक आणि बेकायदा कत्तल रोखण्यासाठी गृह विभागाने गुरुवारी कठोर पावले उचलली आहेत. यापुढे वारंवार आणि संघटितरीत्या गोतस्करी करणा-या टोळ्यांवर थेट ‘मकोका’ (महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या नव्या नियमांची आणि सूचनांची काटेकोर अंमलबजावणी न झाल्यास संबंधित भागाचे पोलिस आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनाच थेट जबाबदार धरले जाईल व त्यांना नियमित आढावा घ्यावा लागेल. राज्यात गोवंश तस्करी आणि अवैध वाहतुकीच्या मुद्यावरून अनेकदा तणाव निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत होता. या वाढत्या घटना आणि विविध संघटनांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारींची गंभीर दखल घेत, या संघटित गुन्हेगारीला मुळासकट मोडून काढण्यासाठी राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे.

# ‘नो व्हेईकल डे’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

### जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी, कर्मचारी आले सायकलवर व पायी । इंधन बचत, पर्यावरण संरक्षणाचा दिला संदेश

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत व पर्यावरण संरक्षणाच्या आवाहनाला तसेच राज्य शासनाच्या हरित उपक्रमांना प्रतिसाद देत अहिल्यानगर जिल्ह्यात शुक्रवारी नो व्हेईकल डे उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासह विविध शासकीय कार्यालयांच्या परिसरात वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या कमी दिसून आली. अनेक अधिकारी व कर्मचारी सायकल, इलेक्ट्रिक वाहन, सार्वजनिक वाहतूक तसेच पायी कार्यालयात पोहोचले.

विशेष म्हणजे निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते,जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक सुरेश आघाव यांनी स्वतः सायकलवरून कार्यालयात येत तसेच उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, गौरी सावंत, तहसीलदार शोभा पुजारी, तहसीलदार संचेती यांनी पब्लिक ट्रान्सपोर्ट चा वापर करून नंतर कार्यालयात पायी चालत येत उपक्रमात सहभाग नोंदविला. त्यांच्या या कृतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यालयात सायकल, इलेक्ट्रिक बाइक व पायी येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र राज्य शाखा अहिल्यानगर तसेच महसूल संघटनेच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. उद्या आपली गाडी घरीच थांबणार हा निर्धार करत कर्मचाऱ्यांनी इंधन बचतीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी एक कर्मचारी – एक वृक्ष दत्तक ही संकल्पनाही मांडण्यात आली. आगामी पावसाळ्यात केवळ वृक्षारोपण न करता प्रत्येक कर्मचाऱ्याने लावलेले झाड जगविण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच शासकीय कार्यालय परिसर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

कर्मचाऱ्यांचा ताणतणाव कमी करण्यासाठी दर महिन्याला सायकल रॅली, ट्रेकिंग, योग, ध्यानधारणा व सुदर्शन क्रिया सत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

या उपक्रमाला मा. जिल्हाधिकारी, मा. अप्पर जिल्हाधिकारी, मा. निवासी उपजिल्हाधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सक्रिय पाठिंबा दिला. वरिष्ठ अधिकारी स्वतः सहभागी झाल्याने कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.






या प्रसंगी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक अलका सूर्यभान मासाळ, महिला जिल्हाध्यक्षा सौ. वंदना नेटके यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात समानतेने इंधन वाटप करा : जिल्हाधिकारी पंकज आशिया

### पेट्रोल, डिझेल पुरवठ्याबाबत आढावा बैठक



● **अहिल्यानगर । वीरभूमी** – जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा सुरळीत पुरवठा राखण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. पेट्रोल, डिझेलचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच प्रत्येक तालुक्यात इंधनाचे समानतेने वाटप करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पेट्रोल, डिझेल पुरवठ्याबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, यांच्यासह विविध कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, पुणे आणि मनमाड येथील इंधन डेपो निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ सुरू ठेवून जिल्ह्यातील पेट्रोल पंपांना इंधनाचा अविरत पुरवठा होईल याची दक्षता घ्यावी. नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

इंधन वाटपावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पेट्रोल पंप परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात यावी. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर नागरिकांना सुरळीत सेवा मिळणे आवश्यक असून पेट्रोलपंप चालकांनी ग्राहकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. पुरवठा साखळी सक्षम ठेवणे तसेच नागरिकांना वेळेत इंधन उपलब्ध करून देण्यासाठी समन्वयाने कार्य करण्यावर भर देण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

बैठकीत जिल्ह्यातील पेट्रोल आणि डिझेल साठा, पुरवठा व्यवस्था, वाहतूक समन्वय तसेच विविध तालुक्यांतील इंधन उपलब्धतेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.




## SPOT NEWS

## अवघ्या ३२ दिवसांत कुरआन शरीफचे भाषांतर पूर्ण

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

ऑल इंडिया उलमा बोर्ड तर्फे मुंबई येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात मुफ्ती मोहम्मद शाकिर मतीउल्लाह खान यांना प्रतिष्ठेचा फखर-ए-हिंद पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातील येरवडा सेंट्रल जेल येथे अवघ्या ३२ दिवसांत संपूर्ण कुरआन शरीफचे भाषांतर लिहून त्यांनी ऐतिहासिक कार्य केले. त्यांच्या या उल्लेखनीय कुरआनी सेवेला गौरव देण्यासाठी हा विशेष सन्मान देण्यात आला. सुमारे १३ वर्षांपूर्वी मुफ्ती साहेबांवर काही निराधार आरोप करण्यात आले होते. त्या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान त्यांना येरवडा कारागृहात ठेवण्यात आले होते. मात्र, नंतर न्यायालयाने सर्व पुरावे आणि तथ्यांचा सखोल अभ्यास करून त्यांना निर्दोष मुक्त केले. सर्व आरोप खोटे आणि बनावट असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मुफ्ती साहेबांनी कठीण परिस्थितीतही संयम, धैर्य आणि चिकाटीचे उदाहरण घालून दिले. तुरुंगातील कालावधीत त्यांनी संपूर्ण कुरआन शरीफचे भाषांतर पूर्ण करून प्रेरणादायी इतिहास रचला. हा पुरस्कार मुंबईचे युवा आयकॉन तथा आमदार परिषद सदस्य जिशान बाबा सिद्दिकी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी माजी आमदार अतुल शाह, मुश्ताक नाखवा, माजी आमदार अण्णा, एनसीपी नेते मोईन कश्मीरी, सुहैल सुभेदार, नबील उझअमा, हाजी शहनवाज, राविश मोमीन, हाफिज यमीन बासर, अझहर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कोपरगाव शहरात पावसाळ्यापूर्वी नालेसफाई मोहिमेला प्रारंभ

### संभाव्य अडचणी लक्षात घेऊन नगराध्यक्ष पराग संधान पालिकेने आधीच खबरदारीचा उपाय

**कोपरगाव । वीरभूमी –**

नगरपालिकेच्या वतीने शहरातील मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. नगराध्यक्ष पराग संधान यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून नालेसफाई स्वच्छता मोहिमेची सुरुवात करण्यात आली. जून महिन्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर संबंधित नाल्यांवर पाणी साचण्याच्या समस्या यापूर्वी अनेकदा दिसून आल्या होत्या. त्यामुळे संभाव्य अडचणी लक्षात घेऊन नगरपालिकेने आधीच खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित नाल्यांमधील घाण, कचरा व साचलेला गाळ काढण्याचा निर्णय घेतला आहे.



या मोहिमेअंतर्गत गोकुळनगरी पुल ते नदीपर्यंत असलेल्या खंदक नाल्यासह आढाव वस्ती ते खडकी परिसरातील प्रमुख नाल्यांच्या साफसफाईच्या कामाला प्रारंभ करण्यात आला. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, कचरा व इतर घाण काढून टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह सुरळीत राहण्यास मोठी मदत होणार आहे. आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर स्वच्छता व नागरिकांच्या आरोग्याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव नगरपालिकेमध्ये विविध विकासात्मक व नागरिकाभिमुख मोहिमा राबविण्यात येत आहे त्यातून नागरिकांना अपेक्षित समस्या दूर होण्यास मदत होत आहे. शहर स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत सुविधांबाबत नगरपालिका प्रशासन सकारात्मक पावले उचलत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी शहरातील सर्व नाल्यांची साफसफाई अत्यंत व्यवस्थित व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात यावी, कोणत्याही ठिकाणी गाळ किंवा कचरा शिल्लक राहू नये, अशा स्पष्ट सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचेही नगरध्यक्ष पराग संधान यांनी सांगितले

या प्रसंगी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, गटनेते प्रसाद आढाव, आरोग्य सभापती वैभव आढाव, संदीप देवकर, सौ. विजयाताई देवकर, कैलास मंजूळ, संजय उदावंत, सिद्धार्थ सोनवणे, निसार शेख, सिद्धेश कपिले, वैभव गिरमे, दीपक जपे, राहुल खरात, ॲड. चंद्रकांत टेके, कैलास सोमासे, कल्पेश नरोडे, रिंकेश नरोडे, प्रशांत वाबळे, शोहेब शेख, साजिद पठाण, स्वराज सूर्यवंशी, भैय्या नागरे, आयुब शेख, संदीप कोपरे, युनूसभाई शेख तसेच नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्र सुरु

**कोपरगाव । वीरभूमी-**

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पॉलीटेक्निक इन्स्टिटयुटमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून तंत्रशिक्षण संचालनालय मार्फत गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट, गौतमनगर (FC CODE-5417) महाविद्यालयामध्ये बुधवार दि. २० पासून प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्र सुरु झाले असल्याची माहिती प्राचार्य वसीम शेख यांनी दिली आहे.




महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षणालयाच्या संकेत स्थळावर प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या आपल्या कागद पत्रांची पडताळणी भरलेल्या माहितीत सुधार करणे आणि ऑनलाईन फॉर्म निश्चिती करणे गरजेचे आहे. या केंद्रातून संस्था व शाखा निवड, विकल्प, अर्ज भरणे प्रवेशाच्या फेऱ्या व प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला हवे असलेले शैक्षणिक संकुल व हवी असलेली शाखा मिळावी यासाठी नवीन नियमावलीनुसार विकल्प अर्जातील विविध पर्यायावरील पसंती आदी बाबींची विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण माहिती दिली जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई, यांच्याकडून दहावीनंतरच्या अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे. २० मे पासून विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया करावी लागणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत अडचणी येऊ नये यासाठी गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट गौतमनगर (कोळपेवाडी) येथे प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्र नियुक्त केले आहे. विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन प्रवेश प्रक्रियेतील येणाऱ्या अडचणी व शंका या सुविधा केंद्रास भेट देऊन दूर कराव्यात असे आवाहन प्राचार्य वसीम शेख यांनी केले आहे.

### श्री स्वामी समर्थ ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमाचे आयोजन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

श्री स्वामी समर्थांच्या कृपाशीर्वादाने तसेच प.पू. मुकुंद महेश्वर करंदीकर ऊर्फ नाना यांच्या प्रेरणेतून अधिकमास पर्वकाळानिमित्त रविवारी दि. २४ मे २०२६ रोजी दिवसभर चालणाऱ्या श्री स्वामी समर्थ ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८.४५ ते सायंकाळी ७.०० या वेळेत होणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्यात स्वामी भक्तांसाठी सामूहिक स्तवन, प्रार्थना, दर्शन व महाप्रसादाचा लाभ उपलब्ध होणार आहे. अधिकमास हा हिंदू धर्मामध्ये अत्यंत पुण्यदायी आणि आध्यात्मिक साधनेसाठी महत्त्वपूर्ण मानला जातो. या पवित्र पर्वकाळात श्री स्वामी समर्थांच्या नामस्मरणाने व स्तवनाने भक्तांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा, मानसिक शांती आणि आध्यात्मिक समाधान लाभते, अशी श्रद्धा आहे.

## कोपरगावात नालेसफाईचा नुसताच गाजावाजा; गटारी मात्र तुडुंब : विजय त्रिभुवन

**कोपरगाव । वीरभूमी-**

शहर गेल्या काही महिन्यापासून तुंबलेल्या गटारी, त्यामुळे वाढलेली दुर्गंधी आणि डासांच्या विळख्यात सापडले असून डासांचे प्रमाण वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी वारंवार नगरपरिषदेला निवेदन दिले मात्र त्याकडे साफ दुर्लक्ष करण्यात आले असतांना नगराध्यक्ष आणि सत्ताधारी नगराध्यक्ष आणि नगरसेवक नुसतेच नाले सफाईचा गाजावाजा करीत असले तरी प्रत्यक्षात शहरातील अनेक प्रभागांतील नाले तुंबलेल्या स्थितीत असल्याचे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते विजय त्रिभुवन यांनी म्हटले आहे.

प्रसिद्धी पत्रकात विजय त्रिभुवन यांनी पुढे म्हटले आहे की, कोपरगा शहरातील नागरिकांसाठी अत्यावश्यक असलेले मुलभूत कामेही सत्ताधारी करताना दिसत नाही. शहरात अनेक नाले तुबलेले असून सांडपाणी नाल्यांच्या वरून वाहत आहे त्यामुळे हे घाण पाणी साचू लागल्याने डासांचे साम्राज्य तयार झाले आहे. नाल्यांवर ढापे टाकले जात नसल्याने शहरातील अनेक भागांत दुर्गंधी पसरलेली आहे. त्यात उन्हाळ्याचे दिवस प्रचंड उष्णता असल्याने शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे नागरिकांना जीवघेणा त्रास सहन करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे लहान मुले आणि ज्येष्ठांना डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांसारख्या जीवघेण्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. तरीही नगरपरिषदेकडून दखल घेतली जात नाही हि दुर्दैवाची गोष्ट आहे.

नगरसेवक आणि सत्ताधारी नगरसेवक अजूनही हारतुरे घेण्यात आणि आ.आशुतोष काळे यांनी मंजूर करून आणलेल्या कामांचे उद्घाटन करण्यात व्यस्त आहे. निवडणुकीच्या काळात नागरिकांना दिलेले शब्द पूर्ण करायचे सोडून काम कमी आणि गाजावाजा जास्त करीत आहे. जेवढा गाजावाजा करीत आहे तेवढेच लक्ष देऊन शहरातील सगळ्याच प्रभागातील नाले साफ करणे गरजेचे आहे. शहरातील रोगराई कमी करून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित कसे राहील यासाठी सत्ताधाऱ्यांनी कामाचा गाजावाजा न करता प्रत्यक्षात कामे करावीत असे राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते विजय त्रिभुवन यांनी शेवटी म्हटले आहे.

## काजवा महोत्सव : अकोलेतील निसर्ग सौंदर्याचा मानबिंदू ...

**सह्याद्रीच्या कुशीत भंडारदराच्या निसर्गरम्य अरण्यात पावसाच्या पहिल्या सरी आधी एक अद्भुत काजव्यांची जादुई दुनिया साकारते. रात्रीच्या शांत अंधारात असंख्य हजारो काजवे आपल्या शरीरातील प्रकाश पेटवतात, तो फक्त एकाचं कारणासाठी प्रेम व्यक्त करण्यासाठी आपल्या जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी. प्रत्येक लुकलुकणारा प्रकाश म्हणजे एक हाक आहे. एक संदेश आहे, एक प्रेमकथा आहे, जी शब्दांशिवाय सांगितली जाते. माणूस वास्तविक जीवनात कृत्रिम प्रकाशात जगतो, पण काजवे आपल्याला स्वयंप्रकाशीत होऊन जगण्याची कला** शिकवतात. हीच कला अनुभवण्यासाठी,

आणि हेच निसर्गाचं अद्भुत रहस्य जाणून घेण्यासाठी, निसर्गाची जिवंत रोशनी स्वतःच्या डोळ्यात साठवण्यासाठी, महाराष्ट्राची चेरापुंजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आमच्या अकोले तालुक्यातील भंडारदरा, घाटघर, कळसुबाई या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणावर या काजवा महोत्सवाचे साक्षीदार होण्यासाठी येत आहे. भंडारदऱ्यात काजव्यांची पर्वणी सुरू होताच, निसर्गाची मायावी दुनिया सज्ज..!

अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसरात पुन्हा एकदा निसर्गाची जादू सुरू झाली. काजव्यांचे आगमन सुरू झाले असून, येत्या काही दिवसात येथे अक्षरशः प्रकाशाची मायावी दुनिया बघायला मिळणार आहे.

सध्या भंडारदरा पानलोट क्षेत्राच्या परिसरात काजवे दिसायला सुरुवात झाली आहे.

हे प्रमाण दिवसेंदिवस वाढणार देखील आहे. आणि येथील संपूर्ण परिसर उजळून निघणार आहे. वळवाच्या पावसामुळे सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यात काजव्यांच्या मिलनाचा उत्सव सुरू झाला आहे, जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी हे काजवे लुकलुकताना दिसतात. आणि याच वेळी हा अद्भुत निसर्गाचा चमत्कार अनुभवण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढू लागते.

दरवर्षी मे महिन्याच्या शेवटी आणि जून महिन्याच्या सुरुवातीला हा काजव्यांचा हंगाम मानला जातो. याच काळात भंडारदरा, घाटघर, कळसुबाईच्या पायथ्याशी असणाऱ्या आदिवासी भागांत हा अनोखा देखावा बघायला मिळतो. विशेष म्हणजे आदिवासी बांधवांच्या मते काजव्यांचे आगमन म्हणजे लवकरच मान्सून येण्याचे संकेत मानले जातात, त्यामुळे या भागात शेती कामालाही वेग आलेला दिसतो आहे.



**भंडारदऱ्याचा परिसर म्हणजे महाराष्ट्राचे छोटे काश्मीरचं...**

सुंदर महाकाय जलाशय, घनदाट जंगले, आकाशाला भिडलेले उंच-उंच डोंगर, आणि नजर अपुरी पडेल इतक्या खोलच खोल दऱ्या. जैवविविधतेने नटलेला हा अकोले तालुक्याचा परिसर जणू पृथ्वीवरील स्वर्गच आहे. अशा प्रकारचा भास या निसर्गरम्य वातावरणात आल्यावर होत असतो. या परिसरात सध्या लगबग सुरू आहे ती म्हणजे वर्षातून एकदाच येणाऱ्या काजवा महोत्सवाची...

काजवे या परिसरात आता चमकू लागले आहे, आणि रात्री या लुकलुकणाऱ्या काजव्यांची प्रणयनृत्य बघण्यासाठी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी सुरू झाली आहे. परंतु आपण देखील काजवा महोत्सवाला जाताय तर तेथील नैसर्गिक जैवविविधतेचा ऱ्हास न होता, आपली स्वतःची नैसर्गिक जैवविविधतेच्या संवर्धनाची भूमिका एक जबाबदार नागरिक म्हणून बाहेरील पर्यटकांना दिसली पाहिजे. इतक्या सुंदर नैसर्गिक घटनेला आपण महोत्सवाचे स्वरूप देतो, तेव्हा त्याचे मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम देखील होतात.

**काजवा म्हणजे काय..?**

तर काजवा हा बीटल समूहातील एक किडा आहे. तो आपल्या मादीला आकर्षित करण्यासाठी चमकत असतो, उन्हाळ्याच्या शेवटी आणि पाऊस पडण्याच्या अगोदर काजवे प्रजनन करतात, याची मादी जमिनीवर असते आणि नर हवेत किंवा झाडांवर बसून प्रकाशाच्या माध्यमातून संदेश देत असतात. प्रत्येक प्रजातीची चमकण्याची वारंवारता, लय वेगळी असते. आणि मादी त्यावरूनच आपल्या प्रजातीचा नर बरोबर ओळखते. प्रजनन झाल्यावर मादी जमिनीवर अंडी देते, आणि ज्या अळ्या असतात त्या जंगलातील जो पालापाचोळा असतो त्यावर फीड करतात. हे काजवा प्रजातीचे संपूर्ण जीवन चक्र आहे.

काजव्यांचा प्रकाश जवळपास पूर्णपणे थंड प्रकाश असतो. निसर्गातील सर्वात कार्यक्षम व सकारात्मक प्रकाशांपैकी हा एक मानला जातो. नागरिक म्हणून आपली जबाबदारी : निसर्ग शांत ठेवावा, कुठल्याही प्रकारचे साऊंड, डी. जे. स्पीकर, संगीत इ. आवाजाची उपकरणे वापरून ध्वनी प्रदूषण करू नये.

LED तसेच तीव्र प्रकाशाचा वापर करू नये. सुरक्षित अंतरावरून निरीक्षण करावं. फ्लॅश लावून फोटो काढू नयेत. काजवे हातात पकडू नये. काजव्यांना पहा... पण त्यांचा संसार बिघडवू नका..!

जेणेकरून आपल्या पुढील पिढ्यांना हा काजवा महोत्सव आपल्याला दाखवता येईल, अन्यथा त्यांना कृत्रिम प्रकाशाचे काजवे बघायला लागतील या गोष्टींची आपण कटाक्षाने काळजी घ्यायला पाहिजे. २०२१ साली एक शास्त्रीय रिपोर्ट थायलंड मधून पब्लिश झाला. तो असा की, ज्या ठिकाणी पर्यटन क्रियाकलाप संकल्पना वाढल्या त्या ठिकाणी काजव्यांची संख्या कमी झाली.

काजवे बघायला जाणे चुकीचे नाही, पण ते एक निसर्गाचे अद्भुत वरदान आहे. त्याचे आपण जतन केले पाहिजे. याचे कारण असे की भविष्यातील पुढील पिढ्यांना ही काजवा प्रजाती बघायला मिळाली पाहिजे. आपण निसर्ग बघण्यासाठी अनुभवण्यासाठी जातो तर निश्चितच त्या ठिकाणी गेल्यावर आपल्याकडून त्या नैसर्गिक सौंदर्याचं जतन ही झालं पाहिजे.



चला अकोलेकर निसर्गाने दिलेला हा अद्भुत वारसा आपण जपूया...

**– प्रतिक ज्ञानेश्वर वाकचौरे**

(M.sc Organic Chemistry अगस्ती महाविद्यालय, अकोले)

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## तहसील प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा ठिय्या आंदोलन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

मौजे टाकळी खादगाव, ता. अहिल्यानगर येथील सौ. सविता संजय पादीर व त्यांचे सासरे देवराम पादीर यांच्या मालकीच्या शेतजमिनीकडे जाणारा पारंपरिक रस्ता काही व्यक्तींनी बेकायदेशीररित्या अडवल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणात तहसील प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात संबंधित कुटुंबाने अखेर अहिल्यानगर तहसील कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले होते. शेती हा उपजीविकेचा मुख्य आधार असताना शेतात जाण्यासाठीचा रस्ता बंद झाल्याने संबंधित कुटुंबाला मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या संदर्भात सविता संजय पादीर यांनी जून २०२४ मध्ये अहिल्यानगर तहसील कार्यालयात लेखी तक्रार अर्ज दाखल करून रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली होती. मात्र, दीर्घ कालावधी उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.त्यानंतर दिनांक २७ मे २०२५ रोजी राज्याच्या महसूल मंत्र्यांकडेही लेखी तक्रार सादर करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत तब्बल सात महिन्यांनी, दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी नायब तहसीलदार गौरव दळवी यांनी टाकळी खादगाव येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली होती. त्यावेळी दोन ते चार दिवसांत प्रश्न मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही जवळपास पाच महिने उलटून गेले असून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे संबंधित कुटुंबाचे म्हणणे आहे. तहसील कार्यालयाच्या वारंवार चकरा मारूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याने संतप्त झालेल्या कुटुंबाने सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश मोहन पोटे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले. या सौ. सविता पादीर, संजय पादीर व अन्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## सीमा खंडागळे यांचे निधन

**कोपरगाव । वीरभूमी-**



येथील नाभिक समाजाच्या कार्यकर्त्या व अत्यंत मनमिळाऊ स्वभावासाठी परिचित असलेल्या सीमा प्रकाश खंडागळे (वय ६४) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने कोपरगाव शहरासह नाभिक समाजात हळहळ व्यक्त होत आहे. सीमा खंडागळे या नाभिक समाजाचे कोपरगाव तालुका मा. अध्यक्ष व सिनेअभिनेते प्रकाश खंडागळे यांच्या पत्नी होत. सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असे. त्यांच्या मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावामुळे त्या सर्वपरिचित होत्या. त्यांच्या पश्चात पती प्रकाश खंडागळे, मुले कुणाल व निखिल खंडागळे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दरम्यान, सीमा खंडागळे यांच्या निधनाबद्दल संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, आमदार विवेक कोल्हे, साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त संभाजी काळे, समता पतसंस्थेचे अध्यक्ष काका कोयटे, माजी नगरसेवक बबलू वाणी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

# सण शांततेत, सामाजिक सलोखा राखून साजरा करा

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती व प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हास्तरीय आढावा बैठक**

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

बकरी ईद हा सण धार्मिक परंपरा आणि सामाजिक सलोखा राखून, शांततामय वातावरणात साजरा करण्यात यावा. शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करत सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून दक्षतेने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती व प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हास्तरीय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त उमेश पाटील, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. मुकुंद राजळे, अन्न व औषध निरीक्षक जी. बी. भोर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, सण उत्साहात साजरा करताना कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. प्राण्यांच्या वाहतुकीदरम्यान तसेच कत्तलीच्या प्रक्रियेदरम्यान प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन होणार नाही, यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष दक्षता घ्यावी. विनापरवाना जनावरांची वाहतूक, सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत कत्तल तसेच अस्वच्छता होणार नाही यासाठी संबंधित विभागांनी संयुक्तपणे कार्यवाही करावी. बकरी ईदच्या निमित्ताने काही तालुक्यांमध्ये तात्पुरत्या कत्तलखान्यांची मागणी होऊ शकते. त्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या, स्वच्छता आणि नियमांचे पालन याकडे विशेष लक्ष द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

कत्तलखाने तसेच इतर ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावून परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा. स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणीय बाबींकडे दुर्लक्ष होणार नाही, याची दक्षता घ्यावी. नागरिकांच्या भावना, धार्मिक परंपरा आणि सार्वजनिक आरोग्य यामध्ये समतोल राखत प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्य करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

## नाना डोंगरे व सीमा गायकवाड यांना 'महाराष्ट्र नायक' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्था व सत कबीर बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे आणि उपक्रमशील शिक्षिका सीमा रामराव गायकवाड यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या ३१ मे रोजी नाशिक रोड येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती मुख्य आयोजक भूषण सरदार यांनी दिली.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिर अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे.

महिला बचत गट मेळावे, युवा संमेलने, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनातून ग्रामीण समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

## ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा उच्च शैक्षणिक पाया रयतमुळे मजबुत : बिपिन कोल्हे

**कोपरगाव । वीरभूमी-**

कर्मवीर भाऊराव पाटलांनी शिक्षणाची गंगा उपेक्षितांच्या दारी आणण्यासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे आणि स्व. शंकरराव काळे यांनी शिक्षण क्षेत्रात राजकीय जोडे बाजुला ठेवत त्यांची विचारधारा थेट तळागाळापर्यंत पोहोचविली, ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा खरा अर्थाने उच्च शिक्षणाचा पाया रयत शिक्षण संस्थेमुळेच मजबुत झालेला आहे तेंव्हा तालुक्यातील नवनिर्वाचित मॅनेजिंग कौन्सील सदस्यांनी त्याचे भान ठेवुन शिक्षण सशक्तीकरणाचे काम करावे असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपिन कोल्हे यांनी केले.



संजीवनी उद्योग समुह व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारीसाखरकारखान्याच्यावतीने अ‍ॅड. संदिप गोरक्षनाथ वर्पे व सुरेश विठ्ठलराव बोळीज यांची रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सील सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा गुरूवारी कार्यस्थळावर सत्कार केला त्याप्रसंगी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. प्रारंभी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

बिपीन कोल्हे पुढे म्हणाले की, खेडयापाडयातील गोर गरीब, वंचित, मागासवर्गीय, दीन दलित, बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी कर्मवीर भाउराव पाटील यांनी स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रिद या घोषवाक्यातुन रयतेची स्थापना केली त्याचा वेलु आज गगनावर गेलेला आहे.

तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री शरदचंद्रजी पवार यांनी बदलत्या मुक्त स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेत काळानुरूप बदल घडवुन आणले आणि ग्रामिण भागात शिक्षणाचा पाया मजबुत केला. अहिल्यानगर जिल्हयासह अन्यत्र रयतेचा विस्तार करण्यांत माजीमंत्री स्व. शंकरराव काळे व स्व. शंकरराव कोल्हे यांनी जीवाचे रान केले.

याप्रसंगी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे, संचालक विश्वासराव महाले, त्रंबकराव सरोदे, आप्पासाहेब दवंगे, निवृत्ती बनकर, बापूसाहेब बारहाते, ज्ञानदेव औताडे, मनेष गाडे, ज्ञानेश्वर होन, विलासराव वाबळे, राजेंद्र कोळपे, विलासराव माळी, संजयराव औताडे, सतिष आव्हाड, रमेश घोडेराव, प्रभारी कार्यकारी संचालक तुळशीराम कानवडे, साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे यांच्यासह विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते, खातेप्रमुख, उपखातेप्रमुख मोठ्या संख्येने हजर होते.

शेवटी संचालक बाळासाहेब वक्ते यांनी आभार मानले.

# ईश्वरी अधिष्ठान व पूर्वजांच्या पुण्याईशिवाय यश शक्य नाही

**माधव बाबा । यूपीएससीत यश मिळवलेल्या अक्षय पवार यांचा शंकर महाराज मठात गौरव**

**पाथर्डी । वीरभूमी-**

बुद्धी संपदेला जाती-धर्माची बंधने आड येत नाहीत. मात्र यशस्वी होण्यासाठी ईश्वरी शक्तीचे अधिष्ठान आणि पूर्वजांची पुण्याई आवश्यक असते, असे प्रतिपादन शंकर महाराज भक्ती मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी केले.

शहरातील घिसाडी समाजातील युवक अक्षय पवार यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन करत वनविभागाच्या सेवेत स्थान मिळवले आहे. त्यांच्या या यशाबद्दल तालुक्यातील विविध स्तरांतून तसेच विविध पक्षांच्या नेत्यांकडून कौतुक होत आहे. तेलंगणा राज्याचे पोलीस महासंचालक तथा तालुक्याचे सुपुत्र महेश भागवत यांच्यानंतर अक्षय पवार यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून तालुक्याचे नाव देशपातळीवर झळकवले आहे.

या यशानिमित्त शहरातील शंकर महाराज मठातर्फे गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील ज्येष्ठ उद्योजक दिलीप भांडकर, पत्रकार अविनाश मंत्री, हरिभाऊ पवार, अविनाश पवार, सचिन नागापुरे, नितीन दुधाळ, सुनील शेवाळे, अयोध्या लाहोटी, साक्षी लाहोटी, प्राची लाहोटी आदींसह अनेक भाविक उपस्थित होते.

यावेळी बोलताना माधव बाबा म्हणाले की, पाथर्डी तालुका संत, महंत आणि अध्यात्माची पवित्र पुण्यभूमी आहे. विविध साधुसंतांच्या साधनेमुळे या भूमीचे चैतन्य अधिक वृद्धिंगत झाले आहे. सद्गुरू शंकर महाराज यांचेही दीर्घकाळ या तालुक्यात वास्तव्य होते. त्यामुळे हा तालुका आता अधिकाऱ्यांचा तालुका म्हणूनही नावारूपाला येत आहे. साधना भूमीचे मधुर फळ अक्षय पवार आणि महेश भागवत यांच्यासारख्या व्यक्तींच्या माध्यमातून समाजासमोर येत आहे.

पवार कुटुंब अत्यंत धार्मिक, परोपकारी व ईश्वरी शक्तीवर पूर्ण विश्वास ठेवणारे आहे. कोणतीही परिस्थिती असली तरी समाधानाने जीवन जगणारे हे कुटुंब असल्याचेही त्यांनी नमूद केले. अभ्यास आणि परिश्रम अनेक जण करतात; मात्र त्या परिश्रमाला यश देण्याचे कार्य ईश्वर करतो. ईश्वरी शक्तीच्या माध्यमातून मिळालेले यश माणसाला उन्मत्त होऊ देत नाही. दैनंदिन जीवनात अध्यात्माचा पाया आणि ईश्वरी अधिष्ठान असेल तर अशा व्यक्तींच्या हातून अलौकिक कार्य घडते, असेही त्यांनी सांगितले.

अक्षय पवार यांच्या भाग्यात मोठा राजयोग असल्याचे सांगत त्यांनी पुन्हा प्रयत्न केल्यास अधिक उच्च पदावरही यश मिळू शकते, असा विश्वास व्यक्त केला. बुद्धी संपदा हीदेखील ईश्वराची देणगी असून तिला जात, धर्म, पंथ किंवा लिंग यांची बंधने नसतात. प्रत्येक कार्यासाठी ईश्वराने योजना आखलेली असते. देशाचा गाडा हाकण्यासाठी ईश्वराने दिलेल्या संधीचे अक्षय पवार यांनी सोने करावे, असे आवाहन त्यांनी केले.



प्रामाणिकपणे, सन्मार्गाने आणि पदोपदी ईश्वरी अधिष्ठान मान्य करत सेवा केल्यास यशाचा सुगंध सर्वत्र दरवळतो. अनैतिक मार्गाने कमावलेली संपत्ती कुळाचा नाश करणारी ठरते. अशा संपत्तीच्या माध्यमातून सुखी जीवन जगणाऱ्यांनाही त्या पापाचे वाटेकरी व्हावे लागते, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

नव्या पिढीतील प्रशासकीय सेवेत येऊ इच्छिणाऱ्या तरुणांना अक्षय पवार यांनी सेवाभावी वृत्तीने मार्गदर्शन करावे. त्या तरुणांमध्येच शंकर महाराजांचे रूप पाहावे. त्यातून मिळणारा आनंद हा स्वर्गसुखाची अनुभूती देणारा ठरेल, असेही माधव बाबा म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन नागापुरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नितीन दुधाळ यांनी मानले.

# ड्रोनच्या साहाय्याने प्रभागाचा डिजिटल नकाशा तयार

## जनगणना कार्यात डॉ. अमोल बागुल यांचा अभिनव उपक्रम

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या डिजिटल जनगणना उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या पूर्वतयारीचे काम वेगाने सुरू आहे. याच अंतर्गत प्रगणक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी आपल्या कार्यक्षेत्रात तंत्रज्ञानाधिष्ठित अभिनव उपक्रम राबविला आहे.

त्यांना नेमून दिलेल्या प्रभागाचा अचूक व अद्ययावत नकाशा तयार करण्यासाठी त्यांनी आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केला. ड्रोनद्वारे संपूर्ण परिसराचे हवाई छायाचित्रण करण्यात आले. त्याच्या आधारे प्रभागातील रस्ते, घरे, गल्ल्या, प्रमुख ठिकाणे तसेच भौगोलिक रचना यांचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. या माहितीच्या आधारे जनगणना कार्यासाठी उपयुक्त असा अचूक व अद्ययावत नकाशा तयार करण्यात आला.

याप्रसंगी आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे घरांची अचूक नोंद, क्षेत्रनिहाय नियोजन तसेच घरभेटी घेणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे जनगणना प्रक्रियेतील अचूकता वाढण्यास मोठी मदत होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनगणना कार्य अधिक प्रभावी करण्याचा हा प्रयत्न इतर प्रगणकांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, अशा उपक्रमांमुळे प्रशासनाच्या कामकाजात अधिक परिणामकारकता येईल.

या वेळी सहायक आयुक्त मेहेर लहारे, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार, मास्टर ट्रेनर डॉ. संतोष देशमुख, रफिक देशमुख, पर्यवेक्षक अलका



दहातोंडे, प्रगणक व कर्मचारी उपस्थित होते.

याविषयी बोलताना डॉ. बागुल यांनी सांगितले की, जनगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास हे कार्य अधिक अचूक, सुलभ आणि परिणामकारक होऊ शकते. त्याच



उद्देशाने ड्रोनच्या साहाय्याने नकाशा तयार करण्याचा हा प्रयत्न करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील या नाविन्यपूर्ण उपक्रमाची नागरिकांसह शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात चर्चा सुरू असून, डिजिटल भारताच्या दिशेने टाकलेले प्रभावी पाऊल म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

# कडक उन्हातही उत्कृष्ठ काम करणाऱ्या दोन प्रगणकांचा गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल जनगणना मोहिमेला अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात वेग आला असून आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना– २०२७ चे काम युद्धपातळीवर सुरू आहे. प्रत्येक प्रगणकाला ३० दिवसांचा कालावधी आणि निश्चित प्रभागनिहाय घरांची जबाबदारी देण्यात आलेली असताना, काही कर्मचाऱ्यांनी आपल्या कामातून वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.

प्रभाग समिती क्रमांक ०२, शहर विभागातील जनगणना २०२७ चे पर्यवेक्षक अनिल सुद्रिक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले प्रगणक अरुण मारुती पवार व सौ. श्रद्धा सुभाष कुलकर्णी यांनी आपल्या वाट्याला आलेले जनगणनेचे





काम तब्बल १०० टक्के पूर्ण करून एक वेगळाच विक्रम प्रस्थापित केला आहे.

विशेष म्हणजे, कडक उन्हाळा, वेळेचे बंधन आणि तांत्रिक प्रक्रियेची आव्हाने असतानाही त्यांनी अत्यंत कमी कालावधीत नकाशा तयार करणे, घरांना क्रमांक देणे आणि HLO n च्या साहाय्याने घरगणना प्रक्रिया वेगाने आणि अचूकपणे पूर्ण केली. त्यांच्या या कामगिरीने जनगणना मोहिमेत नवा मापदंड निर्माण केला असल्याची चर्चा महानगरपालिका वर्तुळात सुरू आहे.

या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कामगिरीची दखल घेत अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर तसेच सहायक आयुक्त मेहेर लहारे यांनी त्यांचा विशेष सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी त्यांच्या कार्याचे कौतुक करत इतर प्रगणकांसाठीही हा आदर्श असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

प्रभारी अधिकारी अजीम शेख यांचे मार्गदर्शन या गटाला लाभले. कडक उन्हात रस्त्यावर फिरत, प्रत्येक घरापर्यंत पोहोचत आणि वेळेची शर्यत जिंकत पूर्ण झालेली ही मोहीम आता इतर प्रगणक व पर्यवेक्षक यांच्यासाठी प्रेरणेचा विषय ठरत आहे. नियोजन, मेहनत आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर असेल तर कोणतेही लक्ष्य अशक्य नसते, हे या कामगिरीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

अहिल्यानगरच्या जनगणना मोहिमेत आता या कामगिरीची जोरदार चर्चा सुरू असून, अनेकांच्या मते हे केवळ काम पूर्ण होणे नसून कर्तव्यनिष्ठा, समर्पण आणि सांघिक कार्याचा आदर्श नमुना आहे.

# खा. लंके समर्थक चिचोंडी पाटीलच्या सरपंचाला न्यायालयाचा दणका

## तरुणाचे अपहरण करुन मारहाण करणाऱ्या शरद पवार यांचा जामीन फेटाळला

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** खासदार निलेश लंके यांच्या सोशल मीडियाचे काम करणारे किशोर महादेव परभणे यांचे अपहरण करून त्यांना खोलीत डांबून अमानुष मारहाण केल्याच्या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या चिंचोडी पाटील येथील सरपंच तथा खासदार निलेश लंके समर्थक आरोपी शरद खंडू पवार यांचा जामीन अर्ज अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस. आर. शिंदे यांनी फेटाळला आहे.

सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट केल्याच्या कारणावरून किशोर महादेव परभणे यांचे अपहरण करून त्यांना एका खोलीत डांबून अमानुष मारहाण करण्यात आल्याची घटना घडली होती. परभणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रणव विजय मोरे, शरद खंडू पवार आणि मारुती देवराम कोकाटे यांच्याविरोधात ४ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्याबाबत सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट केल्याच्या रागातून ही अपहरण आणि मारहाणीची घटना घडल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात पोलिसांनी शरद खंडू पवार याला अटक करून अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस. आर. शिंदे यांच्या न्यायालयात हजर केले होते. त्यावेळी न्यायालयाने त्याला एक दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. पोलिस कोठडीत असताना तपासी अधिकाऱ्यांना आरोपीकडून समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचे सांगण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांनी त्याला पुन्हा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली.

दरम्यान, जामीन मिळावा यासाठी शरद खंडू पवार यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर अहिल्यानगर येथील अतिरिक्त न्यायदंडाधिकारी एस. आर. शिंदे, कोर्ट क्रमांक १७ यांच्यासमोर सुनावणी झाली. मूळ फिर्यादीच्या वतीने ॲड. आनंद व्यवहारे यांनी बाजू मांडली, तर सरकार पक्षाच्या वतीने ॲड. धैर्यशील उर्फ अजित लक्ष्मण वाडेकर यांनी युक्तिवाद करत जामीन अर्जास विरोध केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने शरद खंडू पवार यांचा जामीन अर्ज फेटाळला. या प्रकरणातील चौकशीतून आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# संजीवनी आश्रमशाळेच्या माजी विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

## सुमित कोल्हे । एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियामध्ये सचिन पवार यांची निवड

**● कोपरगाव । वीरभूमी–** माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या दूरदृष्टीतून सन २००४ मध्ये आदिवासी समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने तालुक्यातील टाकळी येथे संजीवनी एकलव्य आदिवासी आश्रमशाळेची स्थापना करण्यात आली. आजपर्यंत अनेक आदिवासी विद्यार्थी शिक्षणाच्या बळावर सक्षम होऊन स्वावलंबी बनले आहेत. नांदगाव तालुका, जि. नाशिक येथील खेडेगावातील सचिन साईनाथ पवार याने संजीवनीतून मिळालेल्या शिक्षणासह व्यक्तिमत्त्व विकासाच्या संस्कारांच्या जोरावर एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया अंतर्गत मुंबई येथे तिकीट चेकर पदावर निवड मिळवत संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांच्या स्वप्नांची पूर्तता केली आहे, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त श्री. सुमित कोल्हे यांनी केले.

संजीवनी आश्रमशाळेचे माजी विद्यार्थी सचिन पवार यांची एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया अंतर्गत मुंबई येथे तिकीट चेकर पदावर निवड झाल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात श्री. सुमित कोल्हे बोलत होते. यावेळी डायरेक्टर (नॉन–अकॅडमिक) श्री. डी. एन. सांगळे, प्राथमिक विभागाचे प्राचार्य आण्णासाहेब टकले आदी उपस्थित होते.

सचिन पवार यांनी सन २०११ ते २०२१ या कालावधीत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण संजीवनी आश्रमशाळेत पूर्ण केले. येथे मिळालेल्या शैक्षणिक प्रेरणेतून त्यांनी पुढील शिक्षण पूर्ण केले असून, ते २६ मेपासून सेवेत रुजू होणार आहेत.

यावेळी श्री. सुमित कोल्हे पुढे म्हणाले की, संजीवनीचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांचा सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना



शिक्षणाच्या प्रवाहात आणून स्वावलंबी बनविण्याचा वारसा संस्थेचे अध्यक्ष श्री. नितीनदादा कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी श्री. अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थपणे पुढे सुरू आहे. सचिनसारखे अनेक विद्यार्थी आपल्या कुटुंबातील पहिल्यांदाच नोकरदार होऊन स्वावलंबी बनत आहेत. ही बाब खऱ्या अर्थाने स्व. शंकरराव कोल्हे यांना आदरांजली ठरणारी आहे.

> आम्ही शिकत असताना स्व. शंकरराव कोल्हे हे अधूनमधून आमच्या निवासी शाळेला भेट द्यायचे. आमची विचारपूस करून भविष्यात काय बनायचे, असे प्रश्न विचारत प्रेरणादायी संवाद साधायचे. त्यांच्या थोड्याशा संवादातून आम्हाला महिनाभराची ऊर्जा मिळायची. त्यातून आम्ही जिद्दीने अभ्यासासह इतर उपक्रमांमध्ये सहभागी व्हायचो. त्यांच्या प्रेरणेतूनच मी स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण झालो आणि आज माझ्या अनेक पिढ्यांमधून कुटुंबातील पहिलाच नोकरदार बनलो आहे. याचे सर्व श्रेय स्व. कोल्हे यांच्या विचारांसह येथील व्यवस्थापन आणि सर्व शिक्षकांना जाते.
> – सचिन पवार (माजी विद्यार्थी)